**संविधान साप**शिडी **खेळ**

## परिचय

मित्रांनो, आपण सर्वांनी आपल्या लहानपणी सापशिडी हा खेळ खेळला आहे. त्यामुळे हा खेळ कसा खेळायचा हे आपल्या सर्वांनाच माहित आहे.

या खेळात शिडी लागल्यास आपण वर जातो, आणि सापाच्या तोंडी आल्यास आपल्याला साप चावतो त्यामुळे आपण खाली जातो.

म्हणजे शिडी लागणे ही चांगली गोष्ट आहे म्हणून त्यामुळे आपण वर जातो, याउलट साप चावणे ही वाईट गोष्ट आहे म्हणून त्यामुळे आपण खाली येतो.

शिडी आणि साप याच दोन प्रतिकांचा वापर करून आपण संविधान सापशिडी हा खेळ तयार केला आहे.

शिडीच्या खाली एकता, बंधुता, स्त्री-पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता, न्याय यांसारखी समाजाला पुढे घेऊन जाणारी मूल्य लिहिली आहेत.

तर सापाच्या तोंडाशी सामाजिक भेदभाव, धार्मिक द्वेष, महिलांवर होणारे अत्याचार, भ्रष्टाचार, जंगल तोड यांसारखी समाजाला मागे घेऊन जाणारी किंवा मागास बनवणारी मूल्ये लिहिली आहे.

## खेळ कसा खेळावा

### खेळ सुरू झाल्यावर -

1. सर्वजण शून्यापासून सुरुवात करतात.

2. फासे फेकल्यावर जो आकडा येईल तितके पाऊल व्यक्ती पुढे जातो.

3. शिडी लागल्यास - समजा 3 या आकड्यावर शिडी आहे आणि त्यावर "एकता" हे मूल्य लिहिलेले आहे. जर व्यक्ती तिथे आली, त्यानंतर -

- सर्वप्रथम त्या शब्दावर म्हणजे "एकतेवर" चर्चा करायची. लोकांना एकतेचे **उदाहरणे** आणि महत्व विचारायचे. (शब्दांच्या व्याख्येपेक्षा उहादरणे आणि त्या शब्दाच्या परिणामांवर जास्त चर्चा करायची. त्यामुळे संवादाला एक जिवंतपणा येतो)

उदा.

- एकत्र राहिलो तर आपल्यात भांडण होणार नाही. त्यामुळे लोक शांततेने जगू शकतील.
- एकतेमध्ये ताकत असते. यासाठी "एकीचे बळ" ही कथा सांगता येऊ शकेल.

- कथा - एका व्यक्तीला चार मुले असतात. ती मुले असतात खूप भांडणे करतात. एका दिवशी तो व्यक्ती त्याच्या चार मुलांना बोलवतो, त्यापैकी प्रत्येकाला एक एक काठी देतो. आणि ती तोडायला सांगतो. काठी वेगवेगळी असल्यास लवकर तुटते. मात्र चारही काठ्यांना सोबत आणल्यास ती तुटत नाही. आपणही असेच राहायला पाहिजे.
- देशात सर्वजण एकत्र राहिले तर देशाचा विकास झपाट्याने होईल.

**शेवटी या चर्चेला संविधानाशी जोडायचे.**

- उदा. भारतीय संविधान आपल्याला एकतेने आणि बंधुतेने राहायला सांगते. हे दोन शब्द संविधानाचे उद्देशिकेत आलेले आहेत. त्यामुळे आपण जेव्हा एकजुटीने वागतो त्यावेळेस आपण संविधानाचे पालन करत असतो.

म्हणजे, एकतेने वागलो की देश मागे जाईल की पुढे? (लोक म्हणतील पुढे) हे झाल्यानंतर सापशिडीवरील व्यक्तीला पुढे जायला सांगायचे.

(त्यानंतर पुढील व्यक्तीसाठी फासे टाकायचे)

4. **साप लागल्यास** -जर कोणी व्यक्ती सापाच्या तोंडाशी आली तर?

उदा. सामाजिक भेदभाव.

- समाजात कोणकोणते भेदभाव होतात याची **उदाहरणे** विचारायची. (शब्दांच्या व्याख्येपेक्षा उहादरणे आणि त्या शब्दाच्या परिणामांवर जास्त चर्चा करायची. त्यामुळे संवादाला एक जिवंतपणा येतो)
- जाती, धर्म, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरिब, शरीराचा रंग -अशी अनेक उदाहरणे लोक सांगतील. कोणाचा काही वैयक्तिक अनुभव असल्यास त्याला तो सांगायला लावायचा. यातून इतर लोक संवेदनशील बनतील.
- मुलांकडून/लोकांकडून प्रामुख्याने जाती-धर्म यांआधारे होणार्या सामाजिक भेदभावाची उदाहरणे येतात. आपण त्यांना अजुन बारीक गोष्टींमध्ये होणारा सामाजिक भेदभाव लक्षात आणुन द्यायचा. जसे की, वर्गात मुला-मुलींमध्ये रंगावरून भेदभाव होतो की नाही? काळ्या किंवा सावळ्या रंगाच्या व्यक्तीला नावे ठेवली जातात की नाही? किंवा कुणी गरीब असेल तर त्यासोबत खूप कमी लोक मैत्री करतात.
- काही लोकांनी जाती किंवा धर्मावरून होणाऱ्या भेदभावाची उदाहरणे सांगितली तर त्यावर सुद्धा संवाद करायचा.

**शेवटी चर्चेला संविधानाशी जोडायचे.**

भारतीय संविधान सर्व प्रकारच्या भेदभावांना नाकारते. आणि आपल्या सगळ्यांना मिळून मिसळून जगायला सांगते. पूर्वी लोकांसोबत पावलोपावली भेदभाव व्हायचं. मात्र भारतीय संविधानाने भेदभावांना बेकायदेशीर ठरवले आहे. त्यामुळे आपण जेव्हा ही कधीही भेदभाव करतो तेव्हा आपण संविधानाच्या विरोधात वागत असतो. (धार्मिक भेदभावावर चर्चा झाल्यास शेवटी धर्मनिरपेक्षतेवर बोलायचे)

जर आपण भेदभाव केला तर देश पुढे जाईल की मागे जाईल? (लोक म्हणतील मागे) हे झाल्यानंतर सापशिडीवरील व्यक्तीला मागे जायला सांगायचे.

(त्यानंतर पुढील व्यक्तीसाठी फासे टाकायचे)

**इतर काही गोष्टी -**

- हा खेळ खेळताना शब्दांवर जितकी जास्त चर्चा होईल तितकी लोकांना मजा येईल आणि लोक संवेदनशीलही बनतील.

- त्यामुळे विविध शब्दांवर विचार करून गेल्यास लोकांसोबत अधिक प्रभावीपणे खेळ खेळता येईल.

- चांगले शब्द लागले की आपण वर जातो, वाईट शब्द लागले की आपण खाली येतो, या दोन कृतीतून त्या शब्दांचा अर्थ मुलांच्या डोक्यात बिंबवणे सहजसोपे होईल.

**खेळाच्या शेवटी सारसंकलन करताना खालील मुद्दे बोलू शकता -**

- हा खेळ जिंकायचे असल्यास वाईट विचारांना टाळावे लागते. अशाच प्रकारे आपल्याला चांगले माणूस बनायचे असले तर वाईट विचारांना सोडावे लागेल आणि चांगले विचारांवर चालावे लागेल.

- वाईट विचार कोणते आणि चांगले विचार कोणते हे आपल्याला भारतीय संविधान सांगते. संविधानाच्या उद्देशिकेत लिहिलेले विचार हे चांगले विचार आहेत.

- मात्र आज टीव्ही, व्हाट्सअप, फेसबुकच्या माध्यमातून वाईट विचारांचा प्रसार काही लोक करत असतात. हे लोक सापासारखे असतात. त्यामुळे आपल्याला अशा लोकांपासून दूर राहायला पाहिजे. (असे लोक आपल्या आजुबाजुला, मोहल्ल्यात, गावात राहातात का? - असा प्रश्न विचारा. कुणाचेही नाव घेणे टाळा)

खेळ खेळताना फासे काय पडतील हे आपल्या हातात नव्हते. मात्र, आयुष्य जगताना काय निवडायचं ते आपल्या हातात नक्कीच आहे. आपले निर्णय आपले आणि देशाचे भविष्य ठरवत असतात.

त्यामुळे "आम्ही भारताचे लोक" म्हणून आपल्या कराय भविष्य हवे आहे, हे आपल्याला ठरवायचे आहे.

**आपल्या सोयीसाठी खाली काही शब्दांची उदाहरणे दिली आहेत. आपण आपलिही काही नवीन उदाहरणे शोधू शकता.**
(प्रत्येक शब्दावर आल्यावर पहिल्यांदा लोकांना उदाहरणे विचारायची आणि त्यावर चर्चा करायची. लोकांकडून उदाहरणे न आल्यास तुम्ही तो शब्द समजावून सांगायचा)

**समाजवाद -**
सोप्या शब्दात समाजवाद म्हणजे गरिबांची काळजी करणे.
गावात चांगल्या सरकारी शाळा, चांगले दवाखाने, राशन, प्रत्येकाच्या हाताला काम मिळणे, थोडक्यात गरिबांचे कल्याण होणे म्हणजे समाजवाद.
आपला देश गरिबांसाठी चालत आहे की श्रीमंतांसाठी?
देश गरिबांसाठी चालला की देश पुढे जाईल की मागे जाईल? चला पुढे..

**धर्मनिरपेक्षता-**
छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार हा धर्मनिरपेक्ष होता. त्यांनी कोणासोबतही जाती धर्मावरून भेदभाव केला नाही. ते सर्वांना सोबत घेऊन चालले.
सर्व जाती धर्माच्या लोकांचा आदर करणे आणि त्यांच्या सोबत सन्मानाने वागणे, म्हणजे धर्मनिरपेक्षता.
आपण असे वागतो का?
जर लोकांनी एकमेकांच्या धर्माचा आदर केला तर आपल्या आजूबाजूचे बहुतांश प्रश्न सुटून जातील. त्याने आपला देश मागे जाईल की पुढे? चला पुढे

**भेदभाव-**
जाती-धर्मावरून होणाऱ्या भेदभावाची उदाहरणे प्रामुख्याने लोक सांगतात. आपण अजून काही भेदभावांकडे लोकांचे लक्ष वेधायचे.
रंगावरून होणारा भेदभाव. (येथे सुंदरतेच्या कल्पनेबद्दल बोलू शकता)
वर्गात जो हुशार असेल त्याच्यासोबतच जास्तीत जास्त लोकांना मैत्री करायची असते, म्हणजे अभ्यासावरून होणारा भेदभाव.
कोण किती चांगले कपडे घालतो यावरूनही भेदभाव केला जातो.
वाढदिवसाला आपल्यापेक्षा गरीब आणि खालच्या जातीच्या वर्ग मित्राला वाढदिवसाला बोलवलं जातं का?

**न्याय-**
महिला जरी सरपंच बनली, तरी खरा कारभार कोण करतात? तिचा नवरा. म्हणजे महिला नेता बनली तरी तिच्या सोबत खरा राजनैतिक न्याय होत नाही. तिला निर्णय घेण्याचा अधिकार मिळेल तेव्हा खरा न्याय होईल.
गरीब मुलांना शिकण्यासाठी स्कॉलरशिप मिळाली तरच त्यांचे शिक्षण पूर्ण होऊ शकेल. याला सामाजिक न्याय म्हणतात.
बस मध्ये मुलींसाठी डावी बाजू राखीव असणे गरजेचे आहे. हे सुद्धा सामाजिक न्याय आहे.
अशाप्रकारे जर देशात खरा न्याय झाला, तर देश मागे जाईल की पुढे? चला पुढे

**गुलामी-**

कुणाच्यातरी बंधनात असणे म्हणजे गुलामी. पूर्वी देश इंग्रजांच्या गुलामीत होता. इंग्रज देशातील लोकांवर जुलूम करत होते. (जालियनवाला बाग हत्याकांडा बद्दल बोलू शकता)

आजच्या गुलामीची उदाहरणे -

आपण सोशल मीडियाचे गुलाम आहोत. त्यात आपला खूप वेळ वाया जातो. आपली चिडचिड होते.

आपण मीडियाच्या प्रचाराचे गुलाम आहोत. मीडिया मधून जर द्वेशाचा प्रचार होत असेल तर आपण त्यालाच सत्य मानतो.

पुढील उदाहरण लोकांना मानसिक गुलामी चांगल्या प्रकारे पाठवून देते -

आपण जाहिरातींचे गुलाम आहोत. जाहिरात सांगते की शरीराचा रंग काळा किवळा सावळा असेल असणे हा मोठा अपराध आहे, त्यामुळे तुम्ही fair & लवली विकत घ्या.

अशा प्रचारामुळे सावळ्या रंगाची लोक न्यूनगंडामध्ये जातात आणि गोळ्या रंगाच्या लोकांना अहंकार येतो. Fair& लवली आणि इतर कॉस्मेटिक क्रीम जास्तीत जास्त विकल्या जाव्यात आणि कंपन्यांचा नफा व्हावा यासाठी आज लोकांना मानसिक गुलाम बनवले जात आहे.

**सर्व धर्मांचा आदर -**

धर्मनिरपेक्षता या शब्दाच्या संदर्भात आपण या मुद्द्याबद्दल बोललो आहे. तरीही लोकांकडून काही उदाहरणे विचारू शकता.

- एकमेकांच्या सणानिमित्त एकमेकांच्या घरी शुभेच्छा द्यायला जाणे. यातून एकता वाढते.
- कुणालाही जातीवरून आणि धर्मावरून टोमणे किंवा त्रास न देणे.
- विविध धर्माचे लोक आपले मित्र असले पाहिजेत यावर विचार करावा.

**असमानता -**

घरी चिकनची भाजी असेल तर लेग पीस मुलाला मिळतं की मुलीला?

मुलगा जन्माला आला तर काय वाटलं जातं आणि मुलगी जन्माला आली तर काय वाटला जाते?

चांगल्या शाळेत शिकवण्यासाठी प्राधान्य कुणाला दिले जाते? मुलाला की मुलीला?

श्रीमंतांच्या मुलांसाठी चांगल्या शाळा आणि गरिबांच्या मुलांसाठी गुणवत्ता नसलेल्या शाळा- ही सुद्धा असमानताच आहे.

**स्वातंत्र्य -**

संविधानापूर्वी सर्वांना शिकण्याचे स्वातंत्र्य नव्हते. बाबासाहेबांना शाळेच्या बाहेर बसून शिकावे लागले.

तुकाराम महाराज म्हणतात, घोकाया अक्षर मज नाही अधिकार. म्हणजे त्यांनाही शिक्षणाचा अधिकार नव्हता.

संविधानापूर्वी सर्वांना मत देण्याचे स्वातंत्र्य नव्हते. फक्त श्रीमंत लोकच मत देऊ शकत होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनाही राजा बनण्याचे स्वातंत्र्य नव्हते. काही लोक त्यांच्या राज्याभिषेकाला विरोध करत होते. कारण त्याकडे विशिष्ट जातीतले लोकच राजे बनू शकत होते, असा समज होता. मात्र शिवाजी महाराजांनी अशा लोकांचं काही एक ऐकलं नाही.

**बंधुता-**
बंधुतेचा सोप्या शब्दात अर्थ म्हणजे एकमेकांचे काळजी करणे.
आपण एकमेकांची काळजी करू, तरच भेदभाव न मानता समानतेने एकमेकांसोबत राहू शकू.
देशातील लोकांची एकमेकांसोबत बंधुता असेल तरच देश मजबूत राहू शकतो, अन्यथा अनेक ठिकाणी भांडणे होतील.
रोजच्या जगण्यातील बंधुतेची उदाहरणे -
घराशेजारी कोणाचा मृत्यू झाला तर त्याच्या घरच्या लोकांसाठी आपण स्वयंपाक बनवतो.
सणाच्या दिवशी काही चांगलं बनलं तर शेजारच्या घरी नेऊन देतो.

**लोकशाही गणराज्य -**
भारत हा एकमेव असा देश आहे ज्याने स्वतंत्र झाल्याबरोबरच इथल्या गरिबांना आणि प्रत्येक वयस्क नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला. अनेक विकसित देशांमध्ये ज्यावेळी महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता त्यावेळी भारतामध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.
भारतीय संविधानामुळेच देश स्वतंत्र होऊन 78 वर्षात दोन महिला राष्ट्रपती झाल्या, अमेरिका स्वतंत्र होऊन 200 वर्षा पेक्षा जास्त काळ जाऊनही तिथे एकही महिला राष्ट्रपती होऊ शकली नाही.
संविधानाने लोकशाही गणराज्य हे तत्व मान्य केल्यामुळेच तळागाळातील व्यक्ती सुद्धा निवडणूक लढवू शकते.

**हुकूमशाही -**
लोकशाहीच्या विरुद्ध असते ती हुकूमशाही. लोकशाहीमध्ये सर्व लोक समान असतात. हुकूमशाही मध्ये काही लोक श्रेष्ठ तर काही लोक गुलाम असतात. हुकूमशाही मध्ये लोक हे कुणाच्यातरी दबावात जगत असतात.
आज सोशल मीडियावर पोस्ट करताना लोकांना भीती वाटते, हे हुकूमशाहीचे उदाहरण आहे.
हुकूमशाहीमध्ये श्रीमंत अजून श्रीमंत होतात, गरीब अजूनच गरीब होतात.
(जागा पाहून बोलणे) सरकार विरोधात बोललात तर देशद्रोही म्हणून अटक करणे. (जनसुरक्षा विधेयक)

**धार्मिक द्वेष -**
आज सर्वच धर्मांचे लोक महागाईने परेशान आहेत. सर्व जाती-धर्माची मुले बेरोजगार आहेत.
सर्वांचे प्रश्न समान आहेत. मात्र सर्वजण सोबत येऊ नये यासाठी लोकांमध्ये जाणीवपूर्वक द्वेष पसरवला जात आहे.
देशाचा साप हा आपल्या हाताला किंवा पायाला चावत नाही. तर तो मेंदूला चावतो. एकदा का हा साप चावला की मग माणूस दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीबद्दल द्वेष करायला लागतो.
जर लोक एकमेकांच्या द्वेष करतील तर त्यामुळे देश पुढे जाईल की मागे?

**लिंगभेद-**
मुलगा मुलगी स्त्री पुरुष यांच्यामध्ये भेदाभेद करणे म्हणजे लिंग भेद.
(मुलांना उदाहरणे विचारा. त्यांकडून उदाहरणे न आल्यास खालील उदाहरणांवर चर्चा करू शकता)

मुलगा जन्माला आल्यावर पेढा वाटला जातो तर मुलगी जन्माला आल्यावर जिलेबी किंवा काहीच नाही.
घरी चिकनची भाजी बनल्यावर लेग पीस मुलाला दिला जातो मुलीला नाही.
मासिक पाळी असताना तीन दिवस महिलांचा विटाळ पाडला जातो. घरी त्यांना वेगळी वागणूक दिली जाते.
मुलगा किंवा मुलीपैकी एकालाच चांगल्या शाळेत शिकवण्याची आर्थिक परिस्थिती असेल तर प्राधान्याने मुलालाच चांगल्या शाळेत टाकलं जातं.

महिला आपल्या समाजाच्या 50% आहेत. स्त्री-पुरुष असा लिंगभेद केला तर महिलांचा विकास होणार का? म्हणजे 50% भारतीयांचा विकासच होणार नाही. म्हणजे देश पुढे जाईल की मागे?

**समानता-**
आतापर्यंत आपण अनेक विषमता आणि भेदाभेदावर धारणे पाहिली आहेत यावरून सांगा की समाजात कोणकोणत्या प्रकारची समानता असणे अपेक्षित आहे.
जात, धर्म, स्त्री पुरुष, आर्थिक, रंग/वजन (सर्वजण सुंदर आहेत असे मानणे)

**जातीवाद -**
(जातिवाद म्हणजे काय आणि त्याची उदाहरणे विचारणे)
दोन वेगवेगळ्या जातींमध्ये लग्न होत नाहीत कारण कोणीतरी स्वतःला वरचा आणि कुणाला तरी खालचा समजतो.
पेपर मध्ये लग्नाच्या जाहिराती जातीनिहाय येतात.
आजही अनेक ठिकाणी मंदिरातील गाभाऱ्यात येण्यासाठी दलितांना मनाई आहे.
आजही घर भाड्याने देताना समोरच्या माणसाची जात विचारली जाते.

**जंगल तोड -**
जंगले ही पृथ्वीची फुफ्फुसे आहेत. जंगलांमुळेच पर्यावरणाचे संतुलन साधले जाते. पृथ्वीवर मोठ्या झपाट्याने होणाऱ्या जंगलतोडीमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. पृथ्वीवर दर मिनिटाला सात फुटबॉलच्या मैदानात इतके जंगल तोडले जाते. इतक्या भयंकर वेगाने पृथ्वीवर जंगलतोड सुरू आहे. त्याचा परिणाम म्हणजे कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे ओला दुष्काळ..
या सगळ्या गोष्टींचा सर्वाधिक फटका हा गरिबांना आणि शेतकऱ्यांना बसत आहे.
भारतातील जंगलांखाली मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती असल्यामुळे जंगले ही मोठ्या कंपन्यांना सोपवली जात आहेत.
(या ठिकाणी वेळेनुसार खरा विकास काय यावर आपण चर्चा करू शकता)
असेच सुरू राहिले तर देश पुढे जाईल की मागे?

**स्त्रियांचा अपमान -**
स्त्रियांना ज्या भेदाभेदाच्या वागणूक दिल्या जातात यांची काही उदाहरणे या ठिकाणी घेऊ शकतो.
- स्त्री-पुरुषांमध्ये कसा भेदभाव केला जातो याची उदाहरणे आपण वर दिलीच आहेत.

**आर्थिक विषमता -**
संविधानाने सांगितल्याप्रमाणे लोककल्याणकारी धोरणे राबवणे हे सरकारचे कर्तव्य आहे.
संविधान म्हणते की देशातील श्रीमंत गरीब जरी कमी व्हायला पाहिजे.
मात्र आज देशात प्रचंड आर्थिक विषमता आहे. देशाच्या एक टक्के श्रीमंत लोकांकडे देशाची तीस टक्के संपत्ती जमा झाली आहे.
महाराष्ट्राच्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या नातूसाठी शाळेत जायला टेस्ला कार विकत घेतली. मात्र दुसरीकडे गरीब मुलांना शाळेत जायला साधी बस सुद्धा येत नाही.